## नियमित दिवाणी दावा क्र.०५/२०२१ मधील निशाणी क्र.२६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ अन्वये दुरुस्तीची परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी नमूद केले की, वादी यांनी दावा परिच्छेद ३ मध्ये चौथ्या ओळीत दक्षिणेकडील ऐवजी उत्तरेकडील व पाचव्या ओळीत दक्षिण–पूर्व च्या ऐवजी उत्तर–पूर्व असे नमूद करण्याचे राहून गेले आहे. सदरची बाब नमूद करण्याचे आवश्यक आहे. सदरची चुक तांत्रीक स्वरुपाची असल्यामुळे मंजूर करण्यात यावी. तसेच सदरची वरील नमूद बाब अर्जात समाविष्ट करण्याची परवानगी दिल्यानंतर मुळ अर्जात कोणताही बदल होत नाही. सदरची बाब मंजूर करण्यात यावी.

३. प्रतिवादी यांनी म्हणणे सादर करुन सदरच्या अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी यांनी नमूद केले की, वादीचे पुरावे नोंदविले गेले आहे आणि उलटतपासणी संपली आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ च्या तरतुदीनुसार या टप्प्यावर दुरुस्ती करता येणार नाही. जर अशा प्रकरची दुरुस्ती केली गेली तर ती प्रतिवादीच्या बाजुची उलटतपासणी पुसल्यासारखी होईल. म्हणुन अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली.

४. अभिलेखावरील दस्तऐवजाची पाहणी केली असता दिसून येते की, प्रस्तुत दावा ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीचे

साक्षीदार क्र. १ यांच सरतपास व उलटतपास झालेला आहे. वादीच्या इतर साक्षीदारांच्या पुराव्याकरीता प्रकरण प्रलंबित आहे.

५. मुळ दाव्यामध्ये वर नमूद बाब टंकलेखीत व तांत्रीक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. वादीला दाव्यामध्ये चुकीचे नमुद करण्याचे कोणतेही योग्य व रास्त कारण असल्याचे दिसुन येत नाही. एकंदरीत दाव्यातील, अर्जातील कथन व प्रतिवादी यांचे म्हणणे विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीच्या हक्कावर कोणताही परिणाम होत असल्याचे दिसून येत नाही. मुळ दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी वादी यांना सदर अर्जामध्ये नमूद करायची राहून गेलेली बाब नमूद करण्याची परवानगी देणे योग्य व संयुक्तीक असल्याचे दिसून येते.

६. दाव्याचे स्वरुप पाहता सदरची दुरुस्तीची मागणी मंजुर केल्यास प्रतिवादींना कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याचे स्वरुप बदलणार नसल्याचे दिसुन येते. वादी यांनी प्रस्तुत दुरुस्तीचा अर्ज सादर करण्याकरिता केलेल्या विलंबाबाबत वादीवर योग्य खर्च लादणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबींचा एकत्रितरित्या विचार करता मी या निष्कर्षाला आलो आहे की, वादीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याकरिता केलेल्या विलंबाकरिता प्रतिवादी यांना रक्कम रुपये ७००/- पुढील तारखेपर्यंत देण्यात यावे.

३. वादी यांनी दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्तीची प्रत पुढील तारखेपर्यंत सादर करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2025.06.16 16:43:48 +0530

नेर. (जी. सी. फुलझळके)

दिनांक – १६.०६.२०२५ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, नेर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order/ Judgment are same word to word as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Ku. B. N. Nare (Grade-III) |
| Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C., Ner. |
| Date | :- | 16/06/2025 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | :- | 16/06/2025 |
| Order/Judgment uploaded on | :- | 16/06/2025 |